# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०२/०५/२०२५
## १०५.१ किलोग्रॅम गांजा आणि गांजा वाहतुक करणारे वाहनासह ६१ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त
## २ आरोपी मध्यप्रदेश येथुन अटक

पोलीस स्टेशन वडोदा :— दिनांक ०२/०५/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना रात्री विभागिय गस्त दरम्यान **उमरी फाटा येथुन २०० मिटर पुढे रोडच्या कडेला ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ उभा दिसला**. पोलीसांना नमुद वाहन संशयीत वाटल्याने पोलीसांनी शासकीय पोलीस वाहन थांबविले असता **ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ चा चालक पोलीसांना पाहुन ट्रक मधुन उडी मारून अंधराचा फायदा घेत पळुन गेला.** पोलीसांनी ट्रकच्या कॅबीनची पाहणी केली असता त्यात खाकी रंगाच्या टेपने पॅक केलेले दोन पॅकेट दिसले. नमुद पॅकेटाचा उग्र वास येत असल्याने नमुद पॅकेट गांजाचे असल्याबाबत त्यांना संशय आला. पोलीस पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकार, कन्हान उपविभाग यांना सदर माहीती देवुन वरीष्ठ अधिकारी यांच्या **मार्गदर्शनात ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ च्या डाल्यात चढुन पंचासमक्ष झडती घेतली असता**

**वेगवेगळया प्लास्टिक चुंगडयांमध्ये हिरवा काळपट रंगाचा पाने फुले, बिया, कळी, देड, बोंडे असलेला एकुण वजन १०५.१ किलोग्रॅम गांजा अंमली पदार्थ मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १०५.१ किलोग्रॅम गांजा एकुण किंमत २१,०२,०००/— रूपये , ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ किंमत ४०,००,०००/— रूपये आणि दोन मोबाईल किंमत १०,०००/— रूपये असा एकुण किंमती ६१,१२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ८ (क), २०(ब) (ii) (सी) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.** सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सदर गुन्हयातील आरोपीचा तात्काळ शोध घेण्याचे आदेश निर्गमित केले. स्थनिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे दिनांक ०४/०५/२०२६ रोजी नमुद गुन्हयातील आरोपी **क्रं १) ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ चा चालक — प्रणयसिंग अमरसिंग दशमेर,वय २० वर्षे, रा. पिपरिया, तह. कुरई, जिल्हा शिवणी याला वाराशिवणी जि.बालाघाट, राज्य मध्य प्रदेश येथुन आणि आरोपी क्रं २) क्लिनर — रोहित रामप्रसाद मरकाम, वय १९ वर्षे, रा.पिपरिया ता. कुरई, जि. शिवणी, राज्य मध्य प्रदेश याला पिपरिया, जि.शिवणी** येथुन ताब्यात घेवुन दोन्ही आरोपींना अटक केली.

लोकमत समाचार

अपराध नशीले पदार्थों की तस्करी के खिलाफ कार्रवाई

# 105 किलो गांजा सहित ₹61 लाख का माल जब्त

लोकमत समाचार सेवा

**कामठी :** नागपुर ग्रामीण पुलिस के अंतर्गत वडोदा पुलिस स्टेशन ने नशीले पदार्थों की तस्करी के खिलाफ बड़ी कार्रवाई करते हुए 105.1 किलोग्राम गांजा जब्त किया है. इस कार्रवाई में ट्रक समेत कुल 61 लाख 12 हजार रुपए का माल बरामद किया गया.

पुलिस के अनुसार, 2 मई की रात गश्त के दौरान उमरी फाटा से करीब 200 मीटर आगे सड़क किनारे एक संदिग्ध ट्रक क्रमांक एमएच-40/बीएल-4445 खड़ा दिखाई दिया. पुलिस वाहन को देखते ही ट्रक चालक अंधेरे का फायदा उठाकर मौके से फरार हो गया. इसके बाद पुलिस ने ट्रक की तलाशी ली, जिसमें खाकी टेप से पैक किए गए पैकेट और प्लास्टिक की बोरियों में भरा गांजा बरामद हुआ. जांच में कुल 105.1 किलो गांजा कीमत 21.02 लाख रुपए. ट्रक की कीमत 40 लाख रुपए और दो मोबाइल फोन कीमत 10 हजार रुपए जब्त किए गए. इस प्रकार कुल 61 लाख 12 लाख रुपए का माल जब्त किया गया. पुलिस ने आरोपियों के खिलाफ एनडीपीएस एक्ट की विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर फरार आरोपी की तलाश शुरु कर दी है. कार्रवाई पुलिस अधीक्षक हर्ष पोद्दार और अपर पुलिस अधीक्षक अनिल म्हस्के के मार्गदर्शन में की गई.



कार्रवाई में जब्त माल के साथ के साथ वडोदा पुलिस.

लोकमत

# गांजाची वाहतूक; दोघांना मध्य प्रदेशात अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कामठी** : स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने शनिवारी (दि.२) मध्यरात्री वडोदा (ता. कामठी) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील उमरी फाटा परिसरात केलेल्या कारवाईमध्ये १०५.१ किलो गांजा जप्त केला होता. या प्रकरणातील फरार गांजा वाहतूकदार दोघांना एलसीबीच्या पथकाने सोमवारी (दि. ४) मध्य प्रदेशातून ताब्यात घेत अटक केली आणि वडोदा पोलिसांच्या स्वाधीन केले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये ट्रकचालक प्रणयसिंग अमरसिंग दशमेर (२०) व क्लिनर रोहित रामप्रसाद मरकाम (१९, दोघेही रा. पिपरिया, ता. कुरई, जिल्हा सिवनी, मध्य प्रदेश) या दोघांचा समावेश आहे. एलसीबी पथकाने शनिवारी मध्यरात्री उमरी फाटा परिसरात ट्रक (क्र. एमएच ४० बीएल ४४४५) अडवून झडती घेतली. मात्र, ट्रकचालक प क्लिनर पळून गेले. पथकाने या कारवाईत ४० लाख रुपयांचा ट्रक, २१ लाख २ हजार रुपयांचा १०५.१ किलो गांजा आणि १० हजार रुपयांचा मोबाइल फोन असा एकूण ६१ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता.

**१०५.१ किलो गांजा जप्त प्रकरण : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**



जप्त केलेल्या गांजासह कामगिरी बजावणारे पोलिसांचे पथक.

तांत्रिक माहितीच्या आधारे ट्रकचालक व क्लिनर मध्य प्रदेशातील रहिवासी असल्याचे समजताच पोलिसांनी त्या दोघांनाही पिपरिया येथून सोमवारी शिताफीने ताब्यात घेत अटक केली. हा गांजा नेमका कुणाच्या मालकीचा आहे, तो कुठून आणला आणि कुठे नेला जात होता, हे मात्र पोलिसांनी स्पष्ट केले नाही. या घटनेचा तपास वडोदा पोलिस करीत आहेत.